# ज्ञान प्रबोधिनी

सौर पौष १९४६ चे मासिक वृत्त
सौर माघ १, शके १९४६
दि. २१/१/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर पौषचे मासिक वृत्त. ★

## ★ समावेशकता ★

### ❖ भौगोलिक विस्तार

ओंकारदादा बाणाईत यांनी रायगड जिल्ह्यात रोहा परिसरातील विविध गावांमध्ये गेली अनेक वर्षे प्रज्ञा विकास प्रकल्प राबवण्यात सहभाग घेतला आहे. या कामाच्या संपर्काचा भौगोलिक विस्तार होण्यासाठी उपयोग व्हावा म्हणून मातृभूमिपूजनाचा कार्यक्रम शाळाशाळांमधून राबवला गेला. एकूण सतरा कार्यक्रम झाले. त्यात सहभागी शाळा – १४, महाविद्यालये – १, गाव पातळीवर – १, संस्था – १ अशा प्रकारे या कार्यक्रमांची विभागणी होती. १,४७८ सदस्यांनी ही उपासना केली.

### ❖ छात्र प्रबोधन

**प्रबोधन दूत निवासी शिबिर –** वेल्हे येथे झालेल्या निवासी शिबिरात महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून झेप गटाचे सात तसेच भरारी गटाचे पाच असे एकूण बारा प्रबोधन दूत (शिक्षक) उपस्थित होते.

**कुमार साहित्य मेळावे :** चिपळूण येथील 'युनायटेड इंग्लिश स्कूल' या शाळेत इ. ७वी ते ९वीचे ४४ विद्यार्थी उपस्थित होते तसेच चिपळूण जवळ पोफळी येथील 'न्यू इंग्लिश स्कूल' या शाळेत तीन तासांच्या मेळाव्यात इ. ८वी, ९वीचे ४३ विद्यार्थी उपस्थित होते.

बदलापूर, मुंबई येथील 'भारत मॉडर्न स्कूल' या शाळेत तीन तासांच्या मेळाव्यास इ. ५वी ते ८वीचे ५० विद्यार्थी उपस्थित होते. पुणे येथील नू. म. वि मुलींची प्रशाला या शाळेत इ. ९वीच्या दोन्ही वर्गात मिळून एकूण ८० विद्यार्थी उपस्थित होते. पद्य वाचन, प्रकट वाचन, मौन वाचन, शाब्दिक खेळ, कवितेला चाल लावणे, कथापूर्ती, निरीक्षण कौशल्ये इत्यादी विषयांना धरून हे मेळावे घेतले गेले. डोंबिवली (२), चिपळूण व पोफळी(२), बदलापूर(१), पुणे(२) या ठिकाणी एकूण सात मेळावे झाले.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

निर्धार प्रकल्पातील विद्यार्थ्यांची LAHI (Lend A Hand India) येथे अभ्यास सहल झाली. Electricals, mechatronics, food processing, carpentry, gardening या trades च्या प्रात्यक्षिकांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष हाताने कृती करून अनुभव घेतला.

प्रज्ञा प्रबोधन वर्ग कुमार गट – दि. १२ जानेवारीला युवकदिनाच्या निमित्ताने इ. ७वी ते ११वीच्या ४३ विद्यार्थ्यांसाठी विसापूर किल्ल्यावर रोमांचक ट्रेक आयोजित केला गेला.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**प्रज्ञा विकास कार्यक्रम, पुणे – क्षेत्र भेट –** सौर पौष १ (२२ डिसें.) रोजी विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आगाखान पॅलेस येथे झाली. वर्गाच्या सर्व पाच केंद्रांवरील एकूण ८० विद्यार्थी उपस्थित होते. संग्रहालयातील सहा दालनांची सविस्तर माहिती घेत सर्व परिसरातील वस्तू पाहिल्या.

**अनुभव शाळा –** पाच केंद्र – सौर पौष ४ (२५ डिसें.) रोजी नाताळ निमित्त विशेष उपक्रम पार पडले. एकूण १५० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. भारत फोर्ज कंपनी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मुलांना नाताळ आणि भारत फोर्ज कंपनी बद्दल माहिती देण्यात आली.

**विकास मित्र – वेल्हे**

**शिक्षणदूत सहल :** सौर पौष ६ आणि ७ (२७ आणि २८ डिसें.) रोजी प्रतापगड, महाबळेश्वर, सज्जनगड, आणि सातारा येथे शिक्षणदूतांसाठी आयोजित करण्यात आली. ही सहल शिक्षणदूतांच्या ज्ञानात भर घालणारी आणि अविस्मरणीय ठरली.

**छोटे सायंटिस्टस् प्रकल्प –** सौर पौष २०, २१ (१०,११ जाने.) रोजी आगाखान इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन यांचे शिक्षक प्रशिक्षण राजकोट (गुजराथ) येथे झाले. यात चार शाळांतील (१ State Board, ४ CBSE) सतरा शिक्षक व एक समन्वयक सहभागी झाले होते.

### ❖ शैक्षणिक साधन केंद्र

**आनंदी शिक्षण प्रकल्प –** प्रशिक्षण– सौर अग्रहायण २५ व २६ (१६ व १७ डिसें.) रोजी हराळी येथे तिसरे शिक्षक प्रशिक्षण शिबिर झाले. या प्रशिक्षणामधे हराळी, रायगड, सांगली व कर्णबधिर शाळेमधील आनंदमित्र सहभागी झाले होते.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

**स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रीय युवा दिन – वॉकॅथॉन**

**ज्ञान प्रबोधिनी पालक शिक्षक क्रीडा महोत्सव २०२४–२५** यंदाचे वर्ष कुटुंब संस्कृती वर्ष आहे. क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने यंदा सौर पौष

२१ (११ जाने.) या दिवशी वॉकॅथॉनचे आयोजन केले होते. शाळेचे पालक, अध्यापक आणि विद्यार्थ्यांबरोबरच परिसरातील नागरिकांसाठीही वॉकॅथॉन सहभागासाठी खुली होती. यामध्ये वय वर्षे २ ते अगदी ८८ पर्यंत वयाच्या सुमारे १,५०० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला हे विशेष. यामध्ये चालण्यासाठी एक, तीन आणि सहा कि. मी. असे वेगवेगळ्या अंतराचे पर्याय उपलब्ध होते.

**क्रीडा प्रात्याक्षिके –** स्वामी विवेकानंद जयंतीच्या पूर्वसंध्येला म्हणजे सौर पौष २१ (११ जाने.) रोजी नवनगर विद्यालय निगडी येथे भव्य क्रीडा प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १,०००हून अधिक विद्यार्थ्यांनी एकोणिस प्रकारातील क्रीडा प्रात्याक्षिके सादर केली. विद्यालयाच्या भव्य प्रांगणात पालक, परिसरातील नागरिक, हितचिंतक, आजी-माजी शिक्षक असे सुमारे ७००० प्रेक्षक हा अनोखा कार्यक्रम बघण्यास उपस्थित होते.

- **स्नेहसंमेलन, क्रीडा प्रात्यक्षिके आणि क्रीडा स्पर्धेचे सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.**

## ★ नवोन्मेषता ★

### ❖ भौगोलिक विस्तार

डोंबिवलीमध्ये विज्ञान दिनाच्या निमित्त विद्यार्थ्यांद्वारे विज्ञान प्रदर्शन आयोजित करायचं ठरलं आहे. यासाठी पुण्याहून युवक विभागातील तीन कार्यकर्ते सौर पौष २२ (१२ जाने.) रोजी डोंबिवलीत गेले. प्रबोधक मंडळ आणि विद्याव्रत गट यांतल्या एकूण मिळून २३ विद्यार्थ्यांशी विज्ञान प्रदर्शनाबद्दल संवाद झाला.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

SAPC प्रकल्पाचे प्रदत्त संकलन प्रश्नावली तीनही वयोगटांकरिता (१३ ते १६, १७ ते १९, २० ते २२) तयार होऊन त्याचे pilot testing पूर्ण झाले. आजपर्यंत अकरा व्यक्तींकडून प्रश्नावली भरून घेतली गेली.

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

**नेतृत्व प्रशिक्षण शिबिर –** नेतृत्व प्रशिक्षण शिबिरासाठी पुणे, पिंपरी चिंचवड, बारामती, शिरूर, राजगुरूनगर, खंडाळा या सहा तालुक्यांमधून एकूण १०४ विद्यार्थ्यांची निवड निवासी नेतृत्व प्रशिक्षण शिबिरासाठी करण्यात आली होती, यापैकी ७३ स्पर्धकांनी शिबिरासाठी नावनोंदणी करून सहभाग नोंदवला. हे चार दिवसीय नेतृत्व प्रशिक्षण निवासी शिबिर वेल्हे येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात आले होते.

**प्रतिभा विकसन विषय सत्रमालिका –** प्रबोधिनीच्या मुक्त विद्या केंद्रांतर्गत दोन्ही वर्गांवर या सत्रांची दोन तासांची दहा सत्रे होणार असून, यातील तीन सत्रे पूर्ण झाली. प्रशासकीय नेतृत्व विकसनच्या जिज्ञासा व आकांक्षा या वर्गातील विद्यार्थी या सत्र मालिकेत सहभागी झाले आहेत.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

**सूर्यनमस्कार यज्ञ –** युवादिन आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त सौर पौष २२ (१२ जाने.) ला गुरुकुलातील विद्यार्थ्यांसोबत अनेक पालक, अध्यापक आणि माजी विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार घालत सहभाग नोंदवला.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

नांदेड येथील क्लासिक एन एक्स जेंट्स कपड्यांचे दुकान (Mall) यांच्या व्यवस्थापक आणि पदाधिकारी यांच्यासाठी नेतृत्व तसेच एच आर च्या दृष्टीने काही पॉलिसी विषयी धोरण ठरवणे असा एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. त्याचबरोबरीने २५ सेल्समन आणि सेल्सगर्ल यांच्यासाठी कामातील शिस्त, पुढाकार घेऊन काम करणे, ग्राहकाभिमुखता अशा विषयांवर प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

महाराष्ट्र पोलीस अधीक्षक कार्यालय (नांदेड) येथील पोलीस इन्स्पेक्टर यांच्यासाठी 'मानसिक आरोग्य' या विषयावर एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. याला एकूण ३५ पोलीस इन्स्पेक्टर व तीन IPS अधिकारी उपस्थित होते. नांदेड पोलीस आयुक्त श्री. अबिनाश कुमार तसेच नांदेड जिल्हाधिकारी श्री. अभिजित राऊत (IAS) यांची उपस्थिती कार्यक्रमासाठी महत्त्वाची ठरली.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

**PCCOE महाविद्यालयामधील कॉम्प्युटर सायन्स आणि IT च्या विभागप्रमुखांची भेट** – PCCOE महाविद्यालयामधील विभागप्रमुख (HoD) आणि अध्यापकांनी संगणक विभागाला भेट दिली. त्यांच्या महाविद्यालयामधील दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे विद्यार्थी इंटर्नशिप करण्यासाठी विभागात येऊ शकतील या बद्दल चर्चा झाली.

## ★ प्रभाव ★

### ❖ भौगोलिक विस्तार

मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे दर वर्षी समूहगायन स्पर्धा व अन्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. दर वर्षी जानेवारी महिन्यात सहभागी शाळांमध्ये जाऊन परीक्षण करण्यात येते. या वर्षी सुमारे १७० शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे.

## ❖ शैक्षणिक साधन केंद्र

सौर पौष ६ (२७ डिसें.) रोजी आनंदी शिक्षण प्रकल्पाचे केंद्र असलेल्या सुहृद मंडळाच्या निगडी येथील कर्णबधिर शाळेचे स्नेहसंमेलन होते. त्याला मा. सुभाषराव देशपांडे यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते. स्नेहसंमेलनाचा विषय – 'छोटे शेतकरी' हा होता. सगळ्या कर्णबधिर मुलांचे सादरीकरण अप्रतिम झाले.

**प्रशिक्षण –** अरुणाचल प्रदेशातील रोईंग आणि तवांग या ठिकाणी अनुक्रमे सौर २५ अग्रहायण (१६ डिसें.) व ३ पौष (२४ डिसें.) रोजी Cultural Documentation या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**विशेष –** नातू फाऊंडेशनकडून सामाजिक संस्थांमध्ये शैक्षणिक साधन केंद्राच्या आनंदी शिक्षण प्रकल्पाला रु. पन्नास हजार आणि आनंदी शिक्षणमधील सहभागी पडसाद कर्ण बधिर विद्यार्थी शाळेला रु. पंचवीस हजारची देणगी मिळाली.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

सौर अग्रहायण २८ (१९ डिसें.) रोजी **मा. राधिका सिंग** (Chishlom TAFE Institute, Melbourne) **यांनी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला भेट** दिली.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री–शक्ती प्रबोधन, ग्रामीण या विभागाच्या बचत गटापासून सुरू झालेल्या कामाच्या त्रिदर्शकपूर्ती कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी व बीज प्रकाशन या दोन्हींच्या संयुक्त विद्यमाने 'आत्मसन्मानाच्या गोष्टी' या विषयावर परिषद सौर पौष १४ (४ जाने.) रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे केंद्रात परिषद योजली होती.

बीज प्रकाशनच्या वतीने आत्मसन्मानाच्या गोष्टी या सर्व प्रक्रियेविषयी पुस्तिका धनश्रीताई बेडेकर यांनी लिहिली. संपूर्ण कार्यक्रमांमध्ये बचत गटाच्या आद्य प्रणेत्या वाच. सुधाताई कोठारी व प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुभाषराव देशपांडे यांचे मार्गदर्शन व संपूर्ण कार्यक्रमात उपस्थिती होती. शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यातील २९ गावांतून ४९ महिला आल्या होत्या. ३० संस्थांचे ४७ कार्यकर्ते महाराष्ट्रभरातून सशुल्क नोंदणी करून परिषदेला आले होते.

ज्ञान प्रबोधिनी, स्त्री–शक्ती प्रबोधन, ग्रामीण कामाच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने १२ जानेवारीला वेल्हे येथे प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते. यामध्ये २३ गावांतील (अंतर ६६ कि. मी. परिसरातील... हायवे चे वर्वे गाव ते वेल्ह्यातील शेवटचे टोक निगडे) ७ गटांतील, २३४ जणींनी सोळा प्रकार सादर केले (वय वर्षे ६ ते ६७ मधील वयोगट)

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### अभिनंदन

- सौर १४ पौष शके १९४६ (४ जानेवारी २०२५) रोजी डोंबिवली येथील टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'तेजस' पुरस्काराने मा. संचालक वाच. गिरीशराव बापट यांना सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक-सामाजिक क्षेत्रात स्वतःच्या प्रज्ञेने मोलाची भर घालणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष वाच. मा. विनयजी सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते हा पुरस्कार गिरीशरावांना देण्यात आला. मा. गिरीशरावांनी आपल्या भाषणात विविध क्षेत्रांत प्रबोधिनीचे काम आज कसे चालू आहे याचा ऊहापोह घेतला, तसेच भविष्यवेध शास्त्राचा उपयोग करून कामांचे दीर्घकालीन नियोजन करण्याची प्रबोधिनीची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत सर्वच शैक्षणिक-सामाजिक संस्थांनी आत्मसात केली पाहिजे, असे प्रतिपादन केले. डोंबिवलीतील विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, प्रबोधिनीच्या डोंबिवली विस्तार केंद्राचे कार्यकर्ते, तसेच अन्य नागरिक असे मिळून सुमारे ३५० जण या कार्यक्रमास उपस्थित होते.
- **ईशान्य भारत स्पर्धा परीक्षा वर्ग (APPSCE) –** सौर अग्रहायण २४ (१५ डिसें.) रोजी APPSCE पूर्व परीक्षा झाली. या परीक्षेसाठी रीवॉच मधील अठरा आणि तवांग मधील २२ विद्यार्थ्यांनी आपण घेतलेल्या मार्गदर्शन वर्गात सहभाग घेतला होता. पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात रीवॉच मधील एकूण ७ आणि फेब्रुवारी २०२४ मध्ये इटानगर, नहरलागून येथे घेतलेल्या पूर्वपरीक्षा वर्गातील आठ असे एकूण पंधरा विद्यार्थी उत्तीर्ण झाले.
- शिवराज पिंपुर्डे यांच्या 'धमाल भटकंतीची' या पुस्तकाला यशवंतराव चव्हाण सेंटर - शिक्षण विकास मंच यांच्या तर्फे दिला जाणारा कै. कुमुद बन्सल लक्षवेधक शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते मिळाला.
- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर** - सौर पौष १५ (५ जाने.) रोजी शिक्षक भारती ह्या शिक्षक संघटनेकडून 'उपक्रमशील शाळा' म्हणून प्रशालेस पुरस्कार मिळाला.

# विभागांचे चालू कामाचे वृत्त

### ❖ शिक्षक प्रशिक्षण केंद्र

सौर पौष १ ते ९ (२२ ते ३० डिसें.) या कालावधीत चेन्नई मधील विविध शैक्षणिक संस्थांसाठी प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली. यात जयगोपाल गरोडिया संस्थेच्या चार शाळांमधील शिक्षकांसाठी संकल्पना अध्ययन आणि वाचन कौशल्य या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या. यात एकूण १३० अध्यापक सहभागी झाले. दयानंद अंग्लो वैदिक स्कूलच्या अध्यापकांसाठी तीन दिवसीय निवासी प्रेरणा वर्ग वैदिक विद्या केंद्र, पुदुचेरी येथे संपन्न झाला. या निवासी वर्गात ५० अध्यापक व शालेय व्यवस्थापक सहभागी झाले. दयानंद अंग्लो वैदिक स्कूलच्या शाळांमधील निवडक ५० विद्यार्थी आणि दहा अध्यापकांसाठी 'चला संशोधनात्मक प्रकल्प करूया' या चार दिवसीय शिबिराची योजना विज्ञान दलाने केली होती.

सौर पौष २० ते २२ (१० ते १२ जाने.) या कालावधीत तामिळनाडू मधील आठ संस्थांमधील अठरा मुख्याध्यापक, शिक्षक, संस्था चालक प्रबोधिनी परिचय सहलीसाठी आले होते.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र

• पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभाग : स्नेहसंमेलनाचे वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**सहनिवासातील मणिपुरी विद्यार्थ्यांची समुद्र विजयाकडे घोडदौड –** आपानबा आणि होन्सो हे दोन विद्यार्थी याच वर्षी ज्ञान प्रबोधिनी – सोलापूरच्या सहनिवासात दाखल झाले. पाचवीत शिकत असलेल्या या दोघांना ऑगस्ट महिन्यात जलतरण प्रशिक्षण सुरू केले. त्यांनी जलतरणामध्ये लवकरच गती पकडली व त्यांची समुद्र पोहण्याच्या स्पर्धेसाठी निवड झाली. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथे सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटनेतर्फे आयोजित राज्यस्तरीय खुल्या २ कि.मी. समुद्र जलतरण स्पर्धेत अवघ्या चार महिन्यांच्या सरावात आपनबा याने १६० मुलांपैकी अकरावा क्रमांक पटकावला तर १ किलोमीटर पोहण्याच्या स्पर्धेत होन्सो याने १३७ मुलांपैकी चौदावा क्रमांक पटकावला.

**प्राणायाम वर्ग –** ९७५ जणांनी घेतला मोफत आरोग्योपचार! प्राणायाम वर्गातर्फे सौर अग्रहायण १६ ते पौष १५ (७ डिसें. २०२४ ते ५ जाने. २०२५) या कालावधीत चार ठिकाणी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

• सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ चिपळूण स्थायी संपर्क केंद्र

**क्रीडाकुल ग्रामीण खेळाडू विकसन –** या प्रकल्पांतर्गत सौर ८ ते ११ पौष (२९ डिसें ते १ जाने.) या कालावधीत पाच उपकेंद्रांवरील मुलांचे एकत्रित हिवाळी क्रीडा शिबिर श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटी ट्रस्टचे क्रीडा संकुल, सावर्डे, ता. चिपळूण. (डेरवण) येथे झाले. या शिबिरात चिपळूण केंद्रातून ५४ मुली व ७१ मुलगे असे १२५ आणि निगडी क्रीडाकुल विभागाच्या अकरा मुली व चौदा मुलगे मिळून २५ खेळाडू असे एकूण १५० खेळाडू सहभागी झाले होते.

• सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**हिरकणी –** चिपळूण तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, आंबडस या शाळेत सौर पौष १६ (६ जानेवारी) रोजी ''हिरकणी''चे पहिले सत्र झाले. या सत्रासाठी ३५ माता उपस्थित होत्या.

**पूरक शिक्षण** अंतर्गत चिपळूण मधील डी. बी. जे. महाविद्यालय येथे अकरावी मधील एकूण १०५ विद्यार्थ्यांसमोर वाचक मेळाव्याचे प्रात्यक्षिक श्री. माधव मुसळे यांनी सादर केले.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**अंतर्गत गुणवत्ता वाढ – अध्यापक प्रशिक्षण, अध्यापक सहाध्याय दिन –** सौर पौष ६ आणि ७ (२७ आणि २८ डिसें.) या दोन दिवशी अध्यापक प्रशिक्षण शिबिर झाले. सौर पौष ६ (२७ डिसें.) रोजी पुढील ठिकाणी अध्यापक गटांनी सहाध्याय दिन म्हणून भेटी दिल्या – भारत इतिहास संशोधक मंडळ (उद्देश– प्राचीन ऐतिहासिक साहित्याविषयी समजून घेणे), शिवापूर तंत्रशाळा, राष्ट्रीय कोशिका विज्ञान संस्था (NCCS) – पुणे विद्यापीठ, (उद्देश –विज्ञानातील आधुनिक तंत्रज्ञान व cell culture मधील मोठ्या प्रयोगशाळांमधील होणारे काम समजून घेणे).

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**व्यक्तिमत्त्व चाचण्या आणि विश्लेषण –** गटात खेळ आणि मानसशास्त्रीय परीक्षण यावर आधारित व्यक्तिमत्त्व परिचयाची Know Your Self आणि MBTI यावर वा. सविता कुलकर्णी आणि वा. विवेक कुलकर्णी यांची दोन आणि श्री. शिरीश जोशी यांचे एक अशी सत्रे झाली. प्रत्येकातील व्यक्तिमत्त्व प्रकारांवर आधारित संवाद विश्लेषण (Transaction Analysis) यावर श्री. शरद सुंकर यांचे सत्र झाले.

**विशेष व्याख्याने –** १) शहरी नियोजन आणि विकास यावर ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि केंद्राचे माजी विद्यार्थी श्री. श्रावण हर्डीकर सर, IAS, MD महा मेट्रो यांचे सत्र झाले.

२) डॉ. एस. जयशंकर यांच्या पुस्तके आणि लेखांच्याआधारे भारतीय परराष्ट्रीय धोरणांचे विश्लेषण यावर श्री. नचिकेतदादा नित्सुरे

३) विवादात्मक प्रश्न कसे हाताळावेत यावर माजी विद्यार्थी-अधिकारी श्री. मुकुल कुलकर्णी, IRS,

४) मुलाखतीसाठी स्वभाव आणि विचार कौशल्ये यावर वा. दीपक गुप्ते आणि वा. विवेक कुलकर्णी यांचे सत्र झाले.

५) श्री. महेश भागवत, IPS आणि श्री. नितीश पाठोडे, IRS यांच्या सहकार्याने भारताचे परराष्ट्रीय धोरण या विषयावर डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांची दोन व्याख्याने झाली.

**APPSCE मुख्य परीक्षा वर्ग** – पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी सध्या आपण पुण्याहून Facilitation व्याख्याने आणि अधिमित्र उपक्रम राबवत आहोत. याच्या अंतर्गत मुख्य परीक्षेचे ओळख सत्र आणि त्याला जोडून काही अभ्यास पद्धती, कौशल्य पद्धती या सत्रांचे आयोजन सुरू केले आहे. या उपक्रमासाठी आपल्या वर्गातून उत्तीर्ण झालेले पंधरा आणि इतर ओळखीतून २५ असे एकूण ४० विद्यार्थी जोडले गेले आहेत.

**ईशान्य भारत विद्यार्थ्यांसाठी यूपीएससी पूर्व परीक्षा २०२५ मार्गदर्शन** – यूपीएससी पूर्वपरीक्षेसाठी दूरस्थ चाचणी उपक्रम सुरू झाला. यात ईशान्य भारतातील त्यातही प्रामुख्याने मणिपूर, नागालंड, अरुणाचल प्रदेश या राज्यांतील यूपीएससी परीक्षेची तयारी करणारे एकूण ६८ विद्यार्थी जोडले गेले आहेत.

**अधिकारी भेटी** – या महिन्यात आपल्या केंद्राच्या विविध ठिकाणी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रबोधिनीत भेट दिली व आपल्या कामाविषयी चर्चा केली.

१. मिलिंद कुलकर्णी – तहसीलदार, नाशिक

२. अशोक दांडगे– OSD to मंत्री अतुल सावे

३. अमित मुंडे– Dy Comm. Income Tax, ठाणे

४. ऋषिकेश देसाई– IPS त्रिपुरा SDPO कांचापूर, त्रिपुरा

५. सुब्रमण्यम केळकर – IPS, SDPO, तमिळनाडू

६. महेश गिते – IPS तेलंगणा

७. नकुल देशमुख – IPS केरळ

८. पंकज देशमुख – SP, पुणे ग्रामीण महाराष्ट्र

९. शैलेश बलकवडे – सह आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे

१०. प्रमोद फळणीकर – IPS Retd., मध्यप्रदेश.

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

**आधुनिक नवरात्र ...एकात्मता महोत्सव –** दि. १२ जानेवारी रोजी ''आधुनिक नवरात्र .. एकात्मता उत्सव'' या कार्यक्रमात ''विविध समाज गट अभ्यास मांडणी'' या सत्रात मुली व महिला यांनी अभ्यास करून आपापल्या समाजाची माहिती सांगितली. एकूण अठरा समाज गटांची मांडणी झाली. यामुळे वेगवेगळे समाज कळले. वस्तीतील महिला, पालक, युवती, मुले, मुली, प्रबोधिनीतील ज्येष्ठ, दादा, ताई असे सगळे मिळून एकूण २१६ सदस्य सहभागी झाले.

### ❖ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

''**कौशल्य शिक्षणाचे महत्त्व**'' **कार्यशाळा** :– या वर्षी आपण 'कौशल्य प्रशिक्षणाचे महत्त्व' ही कार्यशाळा घेण्यासाठी निवडलेल्या शाळांपैकी दहा शाळांमध्ये कार्यशाळा घेतल्या आहेत. आतापर्यंत आपण ८वी, ९वी व १०वी च्या ३५० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो आहोत.

**छोटे इंजिनिअर्स :–** या अंतर्गत वर्ग सुरू असणाऱ्या शाळांमध्ये या महिन्यात इलेक्ट्रिकल कीट वरील जिना वायरिंगचे काम, इलेक्ट्रिकल ड्रॉइंग द्वारे सर्किट कसे असते ते समजावून सांगितले.

**कार्यशाळेतील काही उपक्रम : (कमवा व शिका)** – आपल्याला वेल्हे येथील केंद्रातून चप्पल स्टॅन्ड तयार करण्याची मागणी आली होती. वेल्डिंग तुकडीतील विद्यार्थ्यांनी कमवा व शिका योजनेतून नऊ चप्पल स्टॅन्ड दहा दिवसांत तयार करून पाठवले.

### ❖ संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

**नाद घुमू दे मैत्रीचा –** ज्ञान प्रबोधिनी स्त्री-शक्ती प्रबोधन संवादिनी गटाचे २०२४-२५ हे रौप्य महोत्सवी वर्ष होते. या वर्षातील विविध नाविन्यपूर्ण विशेष उपक्रमांचा सांगता समारंभ सौर पौष २८ (१८ जाने.) रोजी 'नाद घुमू दे मैत्रीचा' या विशाल स्नेहमेळाव्याने संपन्न झाला. अतिशय हृदय अशा या कार्यक्रमाची ध्वनीचित्रफीत ज्ञान प्रबोधिनीच्या यू ट्यूब चॅनेलवर बघता येईल.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**पौड रस्ता आणि औंध संवादिनी** – या वर्षी आधुनिक नवरात्रात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त अहिल्याबाई होळकरांच्या चरित्राचा दूरस्थ पद्धतीने अभ्यास केला. यामध्ये गटातील सदस्यांच्या मांडणीबरोबर ज्ञान प्रबोधिनी पुणेची २००७ तुकडीची विद्यार्थिनी चिन्मयी मुळे /जोशी आणि ज्ञात अज्ञात अहिल्याबाई या पुस्तकाच्या लेखिका मा. विनयाताई खडपेकर यांनी मांडणी केली

### ❖ ज्ञान प्रबोधिनी साळुंब्रे उपकेंद्र

**चित्रकला ग्रेड परीक्षेतील यश** – शासनाच्या असलेल्या चित्रकला एलिमेंटरी परीक्षेला विद्यालयातील. ५६ विद्यार्थी तर इंटरमिजिएटला ५३ विद्यार्थी बसले होते. त्यातील एलिमेंटरीचा निकाल ९८% आणि इंटरमिजिएट निकाल १००% लागला.

**शस्त्र परिचय –** आपल्या देशात संरक्षणाच्या वेळी पोलीस व सैनिक कोणकोणती शस्त्रे वापरतात हे विद्यार्थ्यांना परिचित व्हावे या उद्देशाने, शिरगाव परंदवडीचे P. I. शेख साहेब यांनी प्रत्यक्ष शस्त्र दाखवून, समजून देऊन, हाताळून मार्गदर्शन केले.

**मा. संचालकांची केंद्र भेट व विद्याव्रत –** मा. संचालकांची साळुंब्रे केंद्राला भेट झाली. यावेळी इयत्ता आठवीचे विद्याव्रत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा. संचालकांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

- **पवनामाई उत्सव व क्रीडा शिबिर –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ डोंबिवली विस्तार केंद्र

**वाचक मेळावे –** टिळकनगर – सौर पौष ८ (२९ डिसें.) रोजी प्रबोधक मंडळ, विद्याव्रत व विद्याव्रत जोपासना वर्गातील विद्यार्थ्यांचा छात्र प्रबोधन नित्य दिवाळी अंकावरील वाचक मेळावा झाला. कवितेला चाल लावणे, संपूर्ण अंकाचे निरीक्षण, माझा खण या काव्याचे वाचन चर्चा तसेच या अनुषंगाने माझे व्यक्तिमत्त्व, आपल्यातील दोष/कमतरता ओळखून त्यावरचे उपाय अशी चर्चा गटांमध्ये झाली. (समस्या परिहार) त्यानंतर प्रत्येकाने एक संकल्प केला. 'लेखकांशी गप्पा' या सत्रात छात्र प्रबोधन मासिकाच्या कार्यकारी संपादक मा. शिल्पाताई कुलकर्णी यांची दूरस्थ माध्यमातून मुलाखत घेण्यात आली. अंकाच्या निरीक्षणानंतर अनेक प्रश्न मुलांनी काढले होते. गप्पांच्या माध्यमातून त्यांच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शिल्पाताईंनी दिली.

**शिवाई बालक मंदिर वाचक मेळावा –** सौर अग्रहायण २९ (२० डिसें.) रोजी इ. सातवीच्या मुलांचा वाचक मेळावा झाला. मेळावा ग्रामीण अंकावर झाला. कवितेवर एक सत्र, निरीक्षण कौशल्याचे एक सत्र, कोडं सोडवणे आणि बिया या लेखावर एक सत्र झाले.

**पौरोहित्य विभाग –** विभागातर्फे या महिन्यात ३ संस्कार दूरस्थ झाले.

### ❖ ठाणे स्थायी केंद्र

**मातृभूमी पूजनः–** सौर पौष ६ (२७ डिसेंबर) संवादिनीने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने केलेल्या संकल्प पूर्तीसाठी, घंटाळी मंदिर मध्ये मातृभूमी पूजन करण्यात आले. त्यानंतर ठाणे केंद्रात सध्या चालू असलेल्या कामांबद्दल माहिती दिली गेली आणि प्रसाद वाटून सांगता झाली. एकूण ३० जणांची उपस्थिती होती.

**ओळख स्पर्शाची:–** सौर पौष १२ (२ जानेवारी) या दिवशी मावळी मंडळ या शाळेत पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ओळख स्पर्शाची उपक्रम घेण्यात आला. एकूण ४४४ मुलांचे ओळख स्पर्शाची हे सत्र घेतले गेले.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र

**विकासिका :** सौर पौष ९ (३० डिसें.) रोजी वेळा अमावस्या निमित्त विकासिकेत काम करणाऱ्या सदस्यांना विविध उपक्रम करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कुटुंबात एकोपा रहावा, घरात सुख, शांती, समाधान नांदावे यासाठी काही–काही कृती सुचवल्या होत्या. उदा. कुटुंबातील सर्व सदस्यांनी मिळून शेतात एक झाड लावणे व त्याचे संगोपन करणे, कुटुंबातील ज्येष्ठांच्या मदतीने कुटुंब वृक्ष बनवा, कुटुंबातील सदस्यांना विशेषणे द्या इत्यादी. या आवाहनाला बऱ्याच जणांनी खूप छान प्रतिसाद दिला.

**स्त्री–शक्ती प्रबोधन विभाग :** ज्ञान प्रबोधिनी मध्ये ३ जानेवारी – सावित्रीबाई फुले जयंती ते १२ जानेवारी – राजमाता जिजाऊ जयंती हा काळ आधुनिक नवरात्र म्हणून साजरा केला जातो. हराळी केंद्रामध्ये किशोरी विकास प्रकल्पांतर्गत या निमित्ताने क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. किशोरी विकास प्रकल्पातील सात तांडे आणि दहा गावांतील २८४ किशोरी या उपक्रमात सहभागी झाल्या.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

**वेल्हे केंद्र – ले. कर्नल सुहास गोगटे यांच्या पुतळ्याचे अनावरण –** सौर पौष ८ (२९ डिसें.) रोजी गोगटे कुटुंबीय व अन्य अतिथींच्या उपस्थितीत ले. कर्नल सुहास गोगटे यांच्या पुतळ्याचा अनावरण कार्यक्रम संपन्न झाला. सुरुवातीला 'प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया' या पद्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर गोगटे परिवारातील एका सदस्यांनी कै. ले. कर्नल सुहास गोगटे यांच्या कार्याचा परिचय करून दिला. मा. महेंद्रभाईंनी समर्पणा वाचत नवीन वास्तूतील हेतु / उद्दिष्टांची मांडणी केली. मा. सुभाषराव यांनी समारोप करताना एखाद्या कुटुंबाचे देशाच्या घडणीतील सहभाग सांगताना गोगटे कुटुंबियांचे महत्त्व अधोरेखित केले. एकूण १३ अतिथी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

(पान क्र. ७ व ८ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)

-✡-✡-✡-

# सौर पौष १९४६ मधील प्रकाशचित्रे




प्रा. शिवराज पिंपुडे यांच्या 'धमाल भटकंतीची' या पुस्तकाला लक्षवेधक शैक्षणिक पुरस्कार.



डोंबिवली येथील टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या वतीने मा. संचालक गिरीश श्री. बापट यांना तेजस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




नवनगर विद्यालय, निगडी : पूर्व प्राथमिक स्नेहसंमेलन



नवनगर विद्यालय, निगडी : सूर्यनमस्कार यज्ञ ☞



नवनगर विद्यालय, निगडी : क्रीडा प्रात्यक्षिके



शैक्षणिक साधन केंद्र : प्रशिक्षण



स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण : 'आत्मसन्मानाच्या गोष्टी' परिषद



स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण : क्रीडा प्रात्यक्षिके ☞




संवादिनी : स्मरणिका प्रकाशन




ज्ञान प्रबोधिनी सोलापूर : मोफत आरोग्यत पासणी शिबिर



ज्ञान प्रबोधिनी सोलापूर : स्नेहसंमेलन



ज्ञान प्रबोधिनी हराळी : किशोरी विकास क्रीडा महोत्सव



ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र : पवनामाई उत्सव



ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र : क्रीडा शिबिर



चिपळूण स्थायी संपर्क केंद्र : क्रीडाकुल ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प